# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007


दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/५९
Telephone No. : 020-25621156/57/59
ईमेल/ Email : approval@unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
संकेतस्थळ/ Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. ३ /२०२४

विषय : शिक्षक मान्यता पत्रातील अटींची पूर्तता केल्यानंतर सादर करावयाच्या प्रस्तावांबाबत........

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून कायम / तदर्थ (Ad-hoc)/ तासिका तत्त्वावर, नेमणूक करण्यात येणाऱ्या अध्यापकांचे मान्यतेचे प्रस्ताव संगणकीयप्रणाली मध्ये सुधारणा करून ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत असून त्याप्रमाणे सदर प्रस्तावांवर शिक्षक मान्यतेची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तथापि, यापूर्वी काही अध्यापकांना त्यांची जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर, सेट/नेट/पीएच्. डी. उत्तीर्ण होण्याच्या अटींवर किंवा नेट परीक्षेच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्याच्या अटींवर मान्यता देण्यात आलेल्या आहेत.

ज्या अध्यापकांनी उक्त नमूद केलेल्या अटींची पूर्तता करून विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत अशा अध्यापकांना त्यांच्या मान्यता पत्रात नमूद केलेली अट रद्द करून ऑफलाईन पद्धतीने मान्यता देण्यात आलेल्या आहेत. या कामकाज पद्धतीमध्ये कार्यालयीन वेळेचा अपव्यय होत असल्याने सदर वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी व कामामध्ये सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या संगणकप्रणालीमध्ये योग्य त्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, यापुढे ज्या अध्यापकांनी त्यांच्या मान्यता पत्रात नमूद केलेल्या अटींची पूर्तता केली असल्यास अशा अध्यापकांनी त्यांची संबंधित अट काढून घेण्यासाठीचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने महाविद्यालयामार्फत सादर करावेत. अशा प्रकारे ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह विद्यापीठाकडे सादर करावी.

मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
जा. क्र. सीसीओ / ६६ )
दिनांक: ४ जानेवारी, २०२४ )

(सही) ३/१/२०२४
(डॉ. गुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत :

मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था